तंत्रज्ञान अधिविभाग
दि. १६.१०.२०२०

# नोटीस

**<u>कोव्हीड १९ आणि त्या अनुंषगाने उदभवलेल्या टाळेबंदीच्या पार्श्वभुमीवर मार्च/एप्रिल/मे, २०२० च्या उन्हाळी सत्रातील अंतिम वर्षाच्या अंतिम परीक्षा ऑक्टोबर, २०२० मध्ये आयोजित करण्यात आलेल्या असून सदरच्या ऑनलाईन पध्दतीने होणा—या परीक्षेसंदर्भात खालील सूचना अवलोकनी घ्याव्यात.</u>**

- परीक्षार्थीनी परीक्षेपूर्वी प्रवेशपत्रावरील हॉल तिकीट स्वत:चा बैठक क्रमांक, परीक्षेचे वेळापत्रक व विषय यांची पडताळणी करुन घ्यावी. तसेच वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळावर अद्ययावत करण्यात येणा—या सूचना अवलोकनी घ्याव्यात. परीक्षार्थीनी हॉलतिकीटची प्रिंट काढून सोबत ठेवावी.
- ऑनलाईन/ऑफलाईन परीक्षा देताना कोणत्याही प्रकारचे पुस्तक नोटस, वही, भ्रमणध्वनी, सायंटिफिक कॅलक्युलेटर, डिजिटल डायरी अथवा तत्सम साधने यांचा वापर करण्यास प्रतिबंध आहे, याची नोंद घ्यावी.
- ऑनलाईन परीक्षार्थीनी परीक्षेसाठी उत्तम प्रतीचे इंटरनेट कनेक्शन असलयाची खात्री करुन घ्यावी तसेच ऑनलाईन परीक्षा देण्याचे Portal सोडून अन्य सर्व पोर्टल बंद करावीत आणि Instant Messing Tools (Skype, AIM, MSN Messenger) आणि ई—मेल प्रेग्रॅम बंद करावेत.
- ऑनलाईन परीक्षार्थीनी परीक्षेदरम्यान परीक्षा देत असलेले पोर्टल मिनिमाईज करुन नये.
- परीक्षा कालावधीत इतर अनावश्यक ॲप्स अनइन्स्टॉल करावीत. तसेच आपल्या मोबाईलमधील Google Chrome Software चे Latest Update करुन घ्यावे.
- लॅपटॉप/डेस्कटॉप/मोबाईल पूर्ण चार्ज असल्याची खात्री करावी.
- ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही पध्दतीने होणा—या बहुपर्यायी प्रश्न (MCQ) परीक्षांसाठी छायंकित प्रत व पुनर्मुल्यांकनाची सुविधा उपलब्ध राहणार नाही.
- परीक्षेवेळी परीक्षार्थीच्या आसपास अन्य कोणीत्याही व्यक्तीस उपस्थित रहाता येणार नाही.
- ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देत असताना त्याठिकाणी पुरेसा प्रकाश असणे आवश्यक आहे.
- परीक्षार्थीने लॉगीन केल्यानंतर सबंधित विद्यार्थ्याने त्यामधील माहिती पडताळणी करुन घ्यावी.
- ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देणा—या विद्यार्थीनी डेस्कटॉप, लॅपटॉप (Windows/Linux/Mac.) वेबकॅमे—यासह तसेच स्मार्टफोनचे वेब ब्राउझर अद्ययावत असल्याची खात्री करावी.
- ऑनलाईन परीक्षा देत असताना परीक्षार्थीने मोबाईलवर कोणतेही बाहेरुन येणारे फोन/कॉल स्विकारुन नयेत.
- परीक्षेदरम्यान इतर ॲप अथवा ब्राउझर उघडण्याचा/सर्च करण्याचा प्रयत्न करु नये. या हालचालींची नोंद सॉप्टवेअरमध्ये होणार आहे.
- ॲन्टीव्हायरस विंडो, नोटीफिकेशन, अलर्टस यांचे अनेबल करावेत.
- जर परीक्षेवेळेच्या दरम्यान कोणत्याही कारणास्तव लॉगआऊट झाले तर पूर्वीचे लॉगइन व पासवर्डचे क्रिडेंशियल वापरुन परत लॉगइन होता येईल.
- परीक्षे दरम्यान कोणात्याही कारणास्तव ब्रेक घेता येणार नाही.
- विद्यापीठ संकेतस्थळावर परीक्षेबाबत मार्गदर्शन करणारा व्हिडिओ उपलब्ध असून तो परीक्षार्थीनी पहावा.

SHIVAJI UNIVERSITY
Department of Technology

१६/१०/२०२०
संचालक